अपंग समावेशित शिक्षण योजना (माध्यमिक स्तर) अंतर्गत विशेष शिक्षकांच्या वेतनासाठी सन २०१४-१५ व सन २०१५-१६ करिता राज्य हिस्स्यापोटीचा निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः आयईडीएसएस-२०१७/(प्र.क्र.५७/१७)/टिएनटी-५

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२
तारीख: ०८ नोव्हेंबर, २०१७.

वाचा :-

१. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांकः आयइडीएस/२००९/(१६५/०९)/असंक, दिनांक ३१ ऑगस्ट, २००९.
२. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांकः आयडीईएसएस-२०१४/ १२९/१४/ एसडी-६, दिनांक ४ डिसेंबर, २०१४.
३. शासन निर्णय केंद्रिय मनुष्यबळ विकास मंत्रालय क्रमांकः ५-२/ २०१५-RMSA-IV (GEN/ (SC)/ (ST), दिनांक ३० सप्टेंबर २०१५.
४. शासन निर्णय केंद्रिय मनुष्यबळ विकास मंत्रालय क्रमांकः ३-२/ २०१५-RMSA-IV (GEN/ (SC)/ (ST), दिनांक १९ ऑक्टोबर, २०१५.
५. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांकः आयईडीएसएस २०१५/ (प्र.क्र.५७१/१५)/ टिएनटी-५, दिनांक ०२ डिसेंबर, २०१५.
६. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांकः संकीर्ण-२४१७/(४६/१७)/अर्थसंकल्प, दिनांक १० ऑगस्ट, २०१७.

प्रस्तावना :-

माध्यमिक स्तरावरील अपंग विद्यार्थ्यांना सामान्य विद्यार्थ्यांबरोबर शिक्षण घेता यावे या उद्देशाने केंद्र शासनाने २००९ मध्ये सुरु केलेली १००% केंद्र पुरस्कृत अपंग समावेशित शिक्षण योजना (माध्यमिक स्तर) अंतर्गत विशेष शिक्षकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. सन २०१५-१६ पासून सदर योजना ६०:४० प्रमाणे चालू करण्यात आली आहे. सदर योजनेंतर्गत कार्यरत विशेष शिक्षकांपैकी केंद्र शासनाने सन २०१४-१५ व सन २०१५-१६ मध्ये पात्र ठरविलेल्या ८४० (५१२+३२८) विशेष शिक्षकांच्या वेतनावरील सन २०१४-१५ व सन २०१५-१६ या वित्तीय वर्षामधील खर्च भागविण्यासाठी केंद्र शासनाने संदर्भाधीन दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये त्यांच्या ६०% हिस्स्यापोटीचा रु.१६१३.७९ लक्ष एवढा निधी

राज्य शासनास वितरित केला होता. शासनाने संदर्भाधीन दिनांक ०२ डिसेंबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये सदर निधी वितरीत केला. केंद्र शासनाने पात्र ठरविलेल्या ८४० विशेष शिक्षकांच्या वेतनासाठी राज्य शासनाच्या ४०% हिस्स्यापोटीचा निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

शासन या आदेशान्वये केंद्र शासनाने सन २०१४-१५ व सन २०१५-१६ मध्ये पात्र ठरविलेल्या ८४० (५१२+३२८) विशेष शिक्षकांच्या सन २०१४-१५ व सन २०१५-१६ या वित्तीय वर्षामधील वेतनवरील खर्च भागविण्यासाठी राज्य शासनाच्या ४०% हिस्स्यापोटी एकूण रुपये १०.७५ लक्ष (अक्षरी रुपये दहा कोटी पंच्याहत्तर लक्ष फक्त) इतके अनुदान मंजूर करीत आहे.

२. सदर खर्च मागणी क्रमांक लेखाशीर्ष ई - ३, २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२, समाज कल्याण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, १०४, (००) (०४) माध्यमिक स्तरावरील अपंगाकरिता एकात्मिकृत शिक्षण (आयईडीएसएस) (राज्य हिस्सा) (२२३५ बी८९१), ३६, सहायक अनुदाने (वेतन) " या लेखाशिर्षाखाली आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये उपलब्ध असलेल्या निधीतून भागविण्यात यावा.

३. सदर निधी आहरीत करुन वितरीत करण्यासाठी अवर सचिव/कार्यासन अधिकारी (रोख शाखा), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांना "आहरण व संवितरण अधिकारी" व सहसचिव /उपसचिव (प्रशासन), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांना " नियंत्रक अधिकारी " म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. सदर निधी अवर सचिव/कार्यासन अधिकारी (रोख शाखा), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी कोषागारातून काढून महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद सोसायटीच्या RMSA-IEDSS च्या बँक खात्यामध्ये तातडीने जमा करावा.

५. संदर्भाधीन दिनांक ०२ डिसेंबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आलेल्या निधीतून वेतन अदा करण्यात आलेल्या विशेष शिक्षकांना, राज्य शासनाच्या हिस्स्यापोटीचे उर्वरित थकीत वेतन या निधीतून वितरीत करण्यात यावे. सदर वेतन थेट विशेष शिक्षकांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्याची जबाबदारी राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, चर्नीरोड, मुंबई यांची राहील.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौ.सं.क्र.९५७/१७/व्यय-५, दिनांक १० ऑक्टोबर, २०१७ अन्वये दिलेल्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११०८१११९४५९५२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Charushila D Chaudhari

Digitally signed by Charushila D Chaudhari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b99d7dca0e63be1bd1b7158b95235 37dcc1d46bc807768647a9ed4ff3816ecf3, cn=Charushila D Chaudhari
Date: 2017.11.08 16:49:23 +05'30'

(चारुशीला चौधरी)
उप सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग.
२) आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) अवर सचिव/कार्यासन अधिकारी, रोख शाखा, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) कार्यासन अधिकारी, अर्थसंकल्प, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) शिक्षण संचालक (प्राथमिक)/(माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे
६) उपसचिव, वित्त विभाग, कार्यासन कोषा- व्यय-५, अर्थसंकल्प-८, मंत्रालय, मुंबई.
७) राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, चर्नीरोड, मुंबई.
८) उपसंचालक (लेखा), राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, चर्नीरोड, मुंबई.
९) महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१ व २ मुंबई/ नागपूर.
१०) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१ व २, मुंबई/ नागपूर.
११) संचालक, लेखा व कोषागारे, पुणे.
१२) वरिष्ठ कोषाधिकारी, जिल्हा पुणे.
१३) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/ वांद्रे.
१४) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१५) मा.मंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव.
१६) निवड नस्ती (टिएनटी-५).